## **१८ व्या पिफ अंतर्गत आज मंगळवार दि. १४ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे -**

पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज मंगळवार दि. १४ जानेवारी, २०२० दरम्यान झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आज महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते यांनी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित दिग्दर्शक व निर्माते यांच्याशी संवाद साधला.

**चित्रपट – द शॅडो ऑफ ऑथेल्लो**

**उपस्थिती–** जगतारसिंग कलवाना (सहदिग्दर्शक), फैज खान (सहदिग्दर्शक, गीतकार, अभिनेता), अभिनय शर्मा (अभिनेता), अनिल जाटव (अभिनेता).

गावाकडचे काही सिनेप्रेमी ‘ओमकारा’ या चित्रपटाने प्रेरित होऊन त्या धर्तीवर चित्रपट करायचे ठरवतात. परंतु ते फार खर्चिक असल्याचे लक्षात आल्यावर ते याच विषयावर नाटक करण्याचा निर्णय घेतात. नाटक बसवण्यासाठी शहरातील एका मोठ्या नाट्य कलाकाराला बोलवतात. या नाटकाच्या प्रवासात ‘ऑथेल्लो’च्या कथेतील नाट्य या नटांच्या आयुष्यात घडताना दिसते. अशा प्रकारचा हा चित्रपट आहेत.

- सहदिग्दर्शक जगतारसिंग कलवान यांनी सांगितले, की गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, जाती भेद या सगळयातील संघर्षही हा चित्रपट मांडतो. ‘‘काल्पनिक विश्वातील रोमांचक कल्पना आणि सत्यता व वास्तव याची जाणीव, जीवन जगण्याची पद्धत यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे,” असे ते म्हणाले.

- चित्रीकरणादरम्यान गावातील लोकांसोबतचे अनुभव सांगताना फैज खान म्हणाले, “आपण एखादा प्रामाणिक प्रयत्न करत असू तर आपल्याला खरोखर चांगले लोक व त्यांची मदत मिळते याची प्रचीती आली. आमचे काही चित्रीकरण नक्षली भागात होते. तेथे जाताना आम्हाला चिंता वाटत होती. मात्र आम्हाला आमच्या वाहन चालकांनी विश्वास दिला की तुम्हाला येथे काही त्रास होणार नाही आणि तसेच झाले. तेथील गावकरीही आम्हाला निःस्वार्थीपणे अगदी सेट उभारायलाही मदत करत होते.”

**२) चित्रपट – सुपरनोवा**

**उपस्थिती –**मिचॅट पावलिक (अभिनेता)

ही कथा पोलंडच्या एका खेड्याच्या रस्त्यावर घडते. कथेच्या सुरुवातीलाच एक अपघात होतो त्यात एका माणसाची पत्नी व मुले यांचा मृत्यू होतो. त्यानंतर घडणाऱ्या गोष्टींभोवती हा चित्रपट फिरतो.

- चित्रपटाची कथा सत्य घटनेवर आधारित असल्याचे सांगत अभिनेता मिचॅट पावलिक म्हणाले, “पोलंडमध्ये काही वर्षांपूर्वी अशी अपघाताची घटना घडली होती.त्यावरून दिग्दर्शक बार्तोज कृहलिक यांना या चित्रपटाची कथा सुचली. एक श्रीमंत माणूस, पोलीस आणि एक दारूच्या नशेत असणारा माणूस या तिघांची चित्रपटात मुख्य भूमिका असली, तरी इतर भूमिकाही तितक्याच महत्वाच्या आहेत.”

- “ही कथा खेड्यात, शहरात, जगात कोठेही घडू शकते, अशी आहे. चित्रपटाला मिळणारा प्रतिसाद उत्तम असून विविध स्तरांमधील लोक चित्रपट भावल्याचे सांगत आहेत. येथे पिफमध्येही चित्रपटाचे विद्यार्थी भेटून अभिप्राय देत आहेत. सर्वांना कुठल्या न कुठल्या प्रकारे जवळची वाटेल अशी ही कथा आहे.”, असेही मिचॅट यांनी सांगितले.

**३) चित्रपट – फोटो प्रेम**

**उपस्थिती –** मेहुल शाह (निर्माता), केदार फडके (चलचित्रकार), गायत्री पाटील (दिग्दर्शक, निर्माता), बी. महंतेश्वर (संकलक)

एक गृहिणी ‘माई’एका अंत्यसंस्काराला गेलेली असताना तिला जाणवते की अशा वेळी मृत व्यक्तीचा फोटो शोधला जातो. पण माईला फोटो काढण्याविषयी भीती असल्याने आजवर तिचा एकही फोटो नाही याची तिला जाणीव होते. त्यावर मात करत ती स्वतःचा चांगला फोटो असावा यासाठी प्रयत्न करते, याविषयी हा चित्रपट आहे.

- या चित्रपटात मुख्य पात्राचा भौतिक व भावनिक असा दोन्ही प्रकारचा प्रवास दाखवण्यात आला आहे. यातील भावनिक प्रवासाविषयी चलचित्रकार केदार फडके म्हणाले, “चित्रपटाच्या फ्रेम मधील पात्राच्या जागेवरून त्याचा भावनिक प्रवास दाखवण्याचा आमचा प्रयत्न होता. आमच्या मुख्य पात्राला कॅमेऱ्याविषयीच भीती आहे. त्यामुळे सुरुवातीच्या फ्रेम्समध्ये हे पात्र कायमच फ्रेमच्या केंद्रापासून दूर दाखविले आहे. जसजसा पात्राचा आत्मविश्वास वाढत जातो तसे ते फ्रेमच्या केंद्रस्थानी येत जाते.”

**<u>पत्रकारांना अधिक माहितीसाठी संपर्क : हंड्रेड पर्सेंट पब्लिक रिलेशन्स</u>**
धनश्री भावसार - ९८५०८९०६०० / संपदा सोवनी - ९४०५०३५३७६




‘द शॅडो ऑफ ऑथेल्लो’ या चित्रपटाच्या पत्रकार परिषदेत (डावीकडून) अनिल जाटव, अभिनय शर्मा, फैज खान, जगतारसिंग कलवाना, समर नखाते.




‘सुपरनोवा’ चित्रपटाच्या पत्रकार परिषदेत (डावीकडून) समर नखाते, मिचॅट पावलिक.




‘फोटो प्रेम’ चित्रपटाच्या पत्रकार परिषदेत (डावीकडून) समर नखाते, केदार फडके, मेहुल शाह, गायत्री पाटील, बी. महंतेश्वर.